# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail :** prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक ०२/०७/२०१९

## *मा.पोलीस अधीक्षकांच्या हस्ते सेवा निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांचा गौरव*

आज रोजी गडचिरोली पोलीस दलातुन एकुण १४ पोलीस कर्मचारी सेवानिवृत्त झाले. यामध्ये १) सहा. पो.नि. श्री. दिगांबर नामदेव गंधेवार, २) सहा. फौजदार/५५९ श्री. गणपत डोनुजी सिडाम, ३) सहा. फौजदार/४५२ श्री. देवराव तुकारात बोधनकर, ४)सहा. फौजदार/ गजानन विठ्ठलराव अवधुत, ५) सहा. फौजदार/१२ श्री. देविदास डुकरुजी नैताम, ६) सहा. फौजदार/७९ श्री. वासुदेव लक्ष्मण कोरेत, ७) सहा. फौजदार/५५३ श्री. दलीत भुजंग चांदेकर, ८) पोहवा/५४७ श्री. तुकाराम अर्जुन रायपुरे, ९) सहा. फौजदार/६२३ श्री. देवराव दामाजी पदा, १०) सहा. फौजदार/६५९ श्री. आनंदराव पैकाजी पोटावी, ११) पोहवा/१०६१ श्री. लोमेश्वर कवडुजी बाळबुध्दे, १२) पोहवा/१०७७ श्री. सतिश चोखोबाजी सोनडवले, १३)सहा. फौजदार/१४५१ श्री. जयराम लहारु गोटा, १४) पोहवा/१४५४ श्री. भिमराव सिताराम मेश्राम, यांचा समावेश आहे.

या निमीत्ताने सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा मा. पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरवातीस मा. पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या हस्ते सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सहकुटुंब शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तु देवुन गौरव करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्ती कर्मचारी पोहवा/श्री. तुकाराम अर्जुन रायपुरे यांची कन्या कु. प्राजक्ता रायपुरे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील घेण्यात आलेल्या परिक्षेत असिस्टंट इंजिनियर गृप ए मध्ये निवड झालेबद्दल तिला प्रोत्सहान म्हणुन मा. पोलीस अधिक्षक सा़ो. यांच्या हस्ते रोख १०,००० रु. पारितोषिक, शाल व श्रीफळ देवुन गौरविण्यात आले.

यावेळी आयोजित कार्यक्रमात बोलतांना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी पोलीस खात्यातील अनुभवांचे कथन केले. कु. प्राजक्ता रायपुरे यांनी गडचिरोली पोलीस दल राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा फायदा झाला असे सांगुन आपण पोलीस कुटुंबात जन्माला आलो याचा अभिमान असल्याचे सांगीतले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलतांना त्यांचा उर भरुन आला होता.

मा. पोलीस अधिक्षक, श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी या १४ सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कार्याची प्रशंसा करुन त्यांचा शाल, श्रीफळ देवुन गौरव करुन त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



